# पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी.

## दर पत्रक सुचना पत्रक

जिल्हा परिषद सिंधुदुर्ग अधिनस्त पशुसंवर्धन विभाग यांचे मार्फत कृषि व पशुपक्षी प्रदर्शन 2018 चे आयोजन दि.-07.12.2018 ते दि.11.12.2018 या 05 दिवसांचे कालावधीत कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगतच्या नविन एस.टी.बसस्थानकाजवळील मोकळया मैदानावर आयोजित करावयाचे निश्चित करण्यात आलेले आहे. सदरील प्रदर्शनात विविध प्रकारची सुमारे 400 जनावरे व सुमारे 100 विविध जातीचे पक्षी सहभागी होण्याचे नियोजन करण्यात येत आहे. सदर पशुपक्षांना प्रदर्शन कालावधीत चारा व पशुखाद्य यांचा पुरवठा करावयाचा आहे. प्रति दिन प्रति जनावर मोठी जनावरे-हिरवी वैरण 15 किलो (मका / कडवळ / उसाचे वाडे अशा प्रकारची हिरवी वैरण), वाळलेली वैरण 7 किलो (कडबाकुट्टी), पशुखाद्य (ड्रायस्टॉक राशन) 1.5 किलो व पक्षांना (मॅश राशन) सुमारे 100 ग्रॅम पक्षीखाद्य याप्रमाणात याबाबींचा पुरवठा करावयाचा आहे. याकरीता प्रदर्शन कालावधीतील 05 दिवसांकरीता साधारणत: 30 टन हिरवी वैरण, 14 टन वाळलेली वैरण, 3 टन पशुखाद्याची व 50 किलो पक्षीखाद्याची प्रदर्शनस्थळी आवश्यकता आहे. प्रत्यक्ष पुरवठयाचे / मागणीचे वेळी उपरोक्त बाबींची संख्या कमी अगर जादा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्यक्ष मागणीप्रमाणे उपरोक्त स्थळी सदर बाबींचा पुरवठा करावा लागेल. सदर कार्यक्रम हा दिनांक-07 ते 11.12.2018 या कालावधीत आयोजित करावयाचा असला तरीही काही अपरीहार्य कारणास्तव नियोजित तारखेमध्ये बदल झाल्यास त्यानुसार नियोजित होणा-या दिनांकास सदरचा पुरवठा करणेस बंधनकारक राहील तसेच आपण दिलेले दर दिनांक-31.03.2019 पर्यंत बंधनकारक राहतील.

वरील बाबींच्या पुरवठादाराचा शासन दरकरार उपलब्ध नसल्याने सक्षम पुरवठादारांकडुन खालील अटी व शर्तींच्या अधीन राहुन मोहोरबंद दरपत्रके/निविदा मागविण्यात येत आहेत. अटींची पुर्तता करणा-या पुरवठादारांनी दरपत्रके/निविदा निम्नस्वाक्षरीतांचे नावे **सोमवार, दिनांक-26.11.2018 रोजी ठिक 14:00 वाजेपर्यंत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग** येथे सादर करावीत. **प्राप्त होणारी दरपत्रके त्याच दिवशी ठिक 16:15 वाजता** उपस्थित निविदाधारक वा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक सहायक), पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती कुडाळ, पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती वेंगुर्ला व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचे निविदा समिती मार्फत उघडण्यात येतील.

निविदा / दरपत्रकाच्या अटी व शर्ती :-

- उपरोक्त बाबी या प्रदर्शन कालावधीत आवश्यक असल्याने मागणी आदेशाप्रमाणे तात्काळ पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.
- दरपत्रकामध्ये उपरोक्त नमुद हिरवी वैरण, वाळलेली वैरण, पशुखाद्य व पक्षीखाद्य यांचा प्रत्येकी प्रति किलो दर हा सर्व करांसहीत नमुद करावयाचा आहे.
- उपरोक्त नमुद बाबींचा मंजुर दर, दरपत्रक मंजुर केल्याचे दिनांकापासुन 31 मार्च 2019 पर्यंत बंधनकारक राहील.
- कोणतेही कारण न देता दरपत्रक नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीतांनी राखुन ठेवला आहे.
- दरपत्रक लिफाफ्यामध्ये सिलबंद करुन व लिफाफ्यावर संबंधीत बाबीचे नाव ठळकपणे नमुद करुन लिफाफ्याच्या डाव्या बाजुस पुरवठादाराने आपले नाव, संपुर्ण पत्ता, संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक व भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करावा.
- दरपत्रकामध्ये निविदाकाराने त्याच्या संस्थेचा GST नोंदणी क्रमांक नमुद करावा व GST नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत दरपत्रकासोबत जोडावी. GST लागु नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या निविदाकाराच्या लेटरहेडवर दरपत्रक देण्यात यावे. दरपत्रकासोबत निविदाकाराने आपले पॅनकार्डची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे.
- हिरवी वैरण, वाळलेली वैरण, पशुखादय व पक्षीखादय पुरवठा उत्कृष्ठ दर्जाचा असावा आणि या चारा व पशुपक्षी खाद्यामुळे प्रदर्शनात सहभागी होणा-या पशुपक्षांना कोणत्याही प्रकारची बाधा होणार नाही याची दक्षता पुरवठादाराने घ्यावयाची आहे अन्यथा याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराचीच राहील. पशुखाद्य व पक्षीखाद्य ISI दर्जाचे असावे.

जा.क्र.सिंजिप/पसंवि/तां/प्रदर्शन/727/2018
पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग,
सिंधुदुर्गनगरी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग - 416812
दिनांक - 19 नोव्हेंबर 2018

(स्वाक्षरी)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग,
सिंधुदुर्गनगरी.

प्रत कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्दीकरीता

1. मा.जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी
2. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी.
3. मा.जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी
4. या कार्यालयाचे सुचना फलकावर प्रसिध्दीकरीता